पुढारी MY कोल्हापूर बुधवार, २१ फेब्रुवारी २०२४

# 'व्यवस्थापना'च्या विद्यार्थ्यांनी रोजगाराच्या संधीसाठी योगदान द्यावे : प्रा. थोरात

**कोल्हापूर :** 'व्यवस्थापना'च्या विद्यार्थ्यांनी नेहमीच क्षमतांचा विचार करून जास्तीत जास्त रोजगाराच्या संधी समाजासाठी उपलब्ध करून देण्यासाठी योगदान द्यावे, असे प्रतिपादन विवेकानंद कॉलेजचे उपप्राचार्य प्रा. एस. पी. थोरात यांनी केले. बी.बी.ए. विभागातर्फे आयोजित व्यवस्थापन सप्ताह-आरोहन-टेक अ लीडच्या उद्‌घाटनप्रसंगी बोलत होते. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार अध्यक्षस्थानी होते. सप्ताहामध्ये पोस्टर प्रेझेंटेशन, बिझनेस क्वीज, फूड स्टॉल, होलोवीन डे, अतिथी व्याख्यान, गटचर्चा, वादविवाद, स्टेट रिप्रेझेटेशन, पारंपरिक खेळ असे उपक्रम झाले. विभागप्रमुख डॉ. आर. आर. पाटील यांनी प्रास्ताविक केले. अपेक्षा हळदेने आभार मानले. सूत्रसंचालन संयम शाह, रसिका गायकवाड यांनी केले. यावेळी डॉ. सुनील भोसले, प्रा. पी. एम. हर्षे, प्रा. राहत जमखाने, प्रा. रेश्मा चौगले, प्रा. अभिजीत पाटील उपस्थित होते.

21/02/24

21.2.24

मुंबई, ठाणे, पालघर येथून प्रसिद्ध आणि रायगड, रत्नागिरी, पुणे, नाशिक येथून वितरीत

द ■ मराठी दैनिक भारतीय समाज मनाचे प्रतिबिंब

# ग्लोबल टाइम्स

■ Register No. : RNI - MAHAMAR /2012/44621 ■ मुंबई ■ अंक : ४० ■ वर्ष : १२

Web Site : www.theglobaltime.com ■ बुधवार दि. २१ फेब्रुवारी २०२४ ■ पाने : ०८ ■ किंमत : ₹३.००

## विवेकानंदमध्ये व्यवस्थापन सप्ताह – आरोहन टेक अ लीडचे उदघाटन



कोल्हापूर : व्यवस्थापनाच्या विद्यार्थ्यांनी नेहमीच स्वतःच्या असलेल्या विचार करून जास्तीत जास्त रोजगाराच्या संधी समाजासाठी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत, असे प्रतिपादन विवेकानंद कॉलेजचे उप प्राचार्य प्रा. एस. पी. थोरात यांनी केले. ते बी.बी.ए. विभागाच्यावतीने आजपासून आयोजित केलेल्या व्यवस्थापन सप्ताह - आरोहन टेक अ लीडच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहामध्ये पोस्टर प्रेझेंटेशन, बिझनेस क्वीज, फूड स्टॉल, हॅलोवीन डे, अतिथी व्याख्यान, गटचर्चा, वाद-विवाद, स्टेट प्रेझेंटेशन, पारंपरिक खेळ आणि पारितोषिक वितरण असा विविध उपक्रमांचा समावेश करण्यात आला आहे.

अध्यक्षीय भाषणात बोलताना उप प्राचार्य प्रा. एस. पी. थोरात यांनी विद्यार्थ्यांनी अशा प्रकारच्या उपक्रमांचा व्यक्तिमत्व विकासाकरीता उपयोग करून घ्यावा, असे आवाहन केले व विविध स्पर्धांसाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

प्रास्ताविक बी.बी.ए. विभागप्रमुख डॉ. आर. आर. पाटील यांनी केले. आभार कु. अंकिता हळदे हिने मानले तर सूत्रसंचालन संयम शाह व रसिका गायकवाड यांनी केले. या कार्यक्रमासाठी डॉ. सुनिल भोसले, प्रा. पी. एम. हर्षे, प्रा. राहत जमखाने, प्रा. रेश्मा चौगले, प्रा. अभिजीत पाटील, प्रा. सुजाता व विद्यार्थी उपस्थित होते.